सहवेदना

दिलीप पाटील

कोल्हापूर : न्यू पॅलेस परिसर येथील निवृत्त डीवायएसपी दिलीप आण्णासाहेब पाटील (वय ६२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, आई, जावई असा परिवार आहे.

शंकर पाटील

वाघवे : कुर्डू (ता. करवीर) येथील शंकर अर्जुन पाटील (वय ७०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, बहीण, भाऊ असा परिवार आहे.

कोंडी पाटील



कौलव : कौलव (ता. राधानगरी) येथील प्रगतशील शेतकरी कोंडी बापू पाटील (वय १०२) यांचे निधन झाले. ते दादासाहेब पाटील कौलवकर पाणीपुरवठा संस्थेचे माजी चेअरमन आनंदा कोंडी पाटील व राधानगरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रचारक तानाजी पाटील यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे.

राजेंद्र घुले

कोल्हापूर : जुना बुधवार पेठ ब्रम्हपुरी परिसरातील राजेंद्र पोल घुले (वय ६५) यांचे निधन झाले. ते ब्रम्हपुरी चर्चमध्ये १० वर्षे पालक म्हणून सेवा करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

सिद्धार्थ कुरणे

खोची : खोची (ता. हातकणंगले) येथील भिमदीप वारणा सहकारी पाणीपुरवठा संस्थेचे व्हा. चेअरमन सिद्धार्थ नाथा कुरणे (वय ७५) यांचे निधन झाले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मेकॅनिकल सतीश कुरणे यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जलदान विधी शनिवार १५ रोजी सकाळी दहा वाजता आहे.

उत्तम पाटील

निगवे : निगवे दुमाला (ता. करवीर) येथील उत्तम भगवान पाटील (वय ४५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, आई, वडील, भाऊ असा परिवार आहे.

दुंडाप्पा हत्तरकी

गडहिंग्लज : गडहिंग्लज नगरपालिकेचे सेवानिवृत्त लिपीक दुंडाप्पा विराप्पा हत्तरकी (वय ९०) यांचे निधन झाले. गडहिंग्लज येथील प्रसिध्द ऑर्थोपेडीक डॉ. रविंद्र हत्तरकी यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

सौ. शकुंतला शिंत्रे

नेसरी : येथील सौ. शकुंतला काशिनाथ शिंत्रे (वय ६५) यांचे शुक्रवारी सकाळी निधन झाले. माजी फूड इन्स्पेक्टर काशिनाथ शिंत्रे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती, मुलगी, मुलगा असा परिवार आहे.

पांडूरंग सरनाईक

कोल्हापूर : शिवाजी पेठेतील पांडूरंग उर्फ बचनराव सरनाईक (वय ८७) यांचे निधन झाले. ते महापालिकेतील निवृत्त सहायक अधीक्षक होते. सकल मराठा शौर्यपीठाचे प्रकाश सरनाईक यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, मुलगी, भाऊ, नातवंडे असा परिवार आहे.

मधुकर गाडे

कोल्हापूर : रामानंदनगर टेस्टी कॉर्नर येथील मधुकर कृष्णाजी गाडे (वय ८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन मुले, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मसणू कातकर

किणे : येथील मसणू नरसू कातकर (वय ५३) यांचे निधन झाले. अंगणवाडी सेविका अंजना मसणू कातकर यांचे ते पती होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई असा परिवार आहे. रक्षाविसर्जन रविवारी किणे येथे आहे.

रामचंद्र दंडवते

कनाळी : कनाळी (ता. कागल) येथील रामचंद्र गोपाळा दंडवते (वय ७५) यांचे निधन झाले. कामधेनू पतसंस्थेचे संचालक रंगराव दंडवते यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

ट्रक वाहकांची चाचणी नाक्यावरच करावी

कोल्हापूर डिस्ट्रीक्ट लॉरी ऑपरेटर्स असोसिएशनची मागणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्यात प्रवेश करण्यापूर्वी ट्रक वाहकासाठी जास्तीत जास्त ४८ तासांपर्यंत निगेटिव्ह आरटी-पीसीआर चाचणी घ्यावी. यामुळे राज्यातील जीवनावश्यक वस्तूंची पुरवठा साखळी खंडित होण्याची भीती आहे. यासाठी राज्यात प्रवेश करणाऱ्या वाहकांची तपासणी राज्याच्या नाक्यावरच करावी या मागणीचे निवेदन कोल्हापूर डिस्ट्रीक्ट लॉरी ऑपरेटर्स असोसिएशनच्यावतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

राज्यातील मालवाहू वाहक हे इतर राज्यातून आपल्या राज्यात येत असतात. त्यांना महाराष्ट्रात प्रवेश करताना निगेटिव्ह आरटीपीसीआर चाचणी करावी लागते. ही चाचणी जास्तीत जास्त ४८ तासांपूर्वी नाक्यावर करावी, अशी असोसिएशनची मागणी आहे. हे वाहक महामार्गावर काम करत असतात. त्यांची कोविड चाचणी करणे आवश्यक आहे. त्यांना अहवालाची प्रतीक्षा करावी लागते. यामुळे राज्यात प्रवेश करणे अशक्य होते. ४८ तास चाचणीचा नियम देशात कोठेही लागू नाही.

माल वाहतूकदार हे आवश्यक वस्तू, एपीएमसीची उत्पादने, औषधे, महत्वाची वैद्यकीय उपकरणे आणि रुग्णालयांसाठी ऑक्सिजन टँकर, ऑक्सिजन कंद्रे, सिलिंडर्स, निर्यात-आयात कार्गो इत्यादी अत्यावश्यक वस्तूंची वाहतूक करत असतात. यामुळे त्यांना पुन्हा पुन्हा आरटी-पीसीआर चाचणीचा त्रास होत असून यासाठी वेळ जात आहे. यामुळे ते वाहने सोडून पळून जाण्यास भाग पडत आहेत. या तरतुदीचा पुन्हा विचार करावा, अशी मागणी असोसिएशनने केली आहे.

सीमा तपासणी केंद्रावर तसेच देशभरातील टोल नाक्यांवर विनाशुल्क रॅपिड ॲंटीजेन टेस्ट सुविधा व टोलनाक्यावर लसीकरण केंद्र निर्माण करावे. सीमा तपासणी केंद्रावरील तपासणी २-३ तासांपेक्षा जास्त नसावी. वाहनचालकांना खाण्यासाठी व पाण्यासाठी पुरेशी सुविधा पुरवावी. या सूचनांचा पुन्हा फेरबदल करावा, असे या निवेदनात म्हटले आहे.

हेरले ग्रामपंचायत प्रशासन सतर्क

कोरोनाचा वाढता संसर्ग : ४८ तासात ८ जणांचा मृत्यू, १०४ रुग्ण

वार्ताहर
हेरले

हेरले (ता. हातकणंगले) येथे गेल्या ४८ तासात कोरोनामुळे ८ जणांचा मृत्यू झाल्यामुळे व गावात आजअखेर कोरोनाचे १०४ रुग्ण संख्या झाल्यामुळे कोरोनाची गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने गावात विविध उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. ग्रामपंचायतीने गावात प्रत्येक कोरोना रुग्णाच्या घरावर प्रतिबंधीत क्षेत्र अशा झेरॉक्स प्रती चिकटविल्या आहेत. तसेच गावात सॅनिटायझर व औषध फवारणी करण्यास सुरुवात केली आहे.

कोरोना रुग्णाच्या घराभोवती बॅरिकेट लावून ते क्षेत्र सील केले आहे. तसेच प्रत्येक प्रभागवार ग्रामपंचायत सदस्य, आशा वर्कर, शिक्षक, अंगणवाडी सेविका, सामाजिक कार्यकर्ते व मेडिकल असोसिएशनचा प्रतिनिधी असा प्रभागवार गट तयार करून सर्वेक्षण करण्यास सुरुवात केली आहे. ग्रामपंचायत मार्फत हे सर्व नियोजन उपसरपंच सतीश काशीद, माजी उपसरपंच विजय भोसले, पोलीस पाटील नयन पाटील, ग्रामविकास अधिकारी संतोष चव्हाण, तलाठी एस. ए. बरगाले यांनी करून सर्व यंत्रणा कामास लावली आहे. या यंत्रणेला गावातील सर्व ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, तसेच डॉ. राहुल देशमुख, आरोग्य सेवक रोहीत पाटील, मुख्याध्यापक विठ्ठल दबडे, रावसो चोपडे हे विशेष सहकार्य करीत आहेत.

हेरले : येथे कोरोना प्रतिबंधक क्षेत्रात औषध फवारणी करताना ग्रामपंचायत कर्मचारी.

मेंढ्यांच्या पिलांवर तरससदृश प्राण्याचा हल्ला

वाकरे येथील घटना : मेंढपाळांना नुकसानभरपाईची व संरक्षणाची मागणी

प्रतिनिधी
वाकरे

वाकरे (ता. करवीर) येथील सरपंच वसंत तोडकर यांच्या शेतामध्ये खुपीरे येथील बिरु सिधू हराळे यांची बकरी बसण्यासाठी होती. बकरी दिवसभरामध्ये चरण्यासाठी बाहेर गेली असता तेथे तरस सदृश्य प्राण्याने बकऱ्यांच्या पिलांवर हल्ला करून सुमारे दहा पिल्ली फस्त केली. यामुळे मेंढपाळ बिरु हराळे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

याची माहिती मिळताच मल्हार सेना सरसेनापती बबनराव रानगे यांच्या मार्गदर्शनाखाली मल्हार सेना करवीर तालुका अध्यक्ष विक्रम शिणगारे, जिल्हा संघटक सुरेश लाडगे, खुपीरे ग्रा. पं. सदस्य भगवान हराळे, संघटनेचे जेष्ठ मार्गदर्शक बबन शिणगारे, विठू गावडे यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन संबंधित धनगर बांधवास भेटून माहिती घेतली. या घटनेचा पंचनामा नुकसानभरपाई देणेबाबत सूचना देण्यात आली.

वाकरे : बकऱ्यांच्या पिल्लांवर तरससदृश प्राण्याने हल्ला केला. यावेळी पाहणी करताना बबन रानगे, विक्रम शिणगारे, सुरेश लाडगे आदी.

पट्टणकोडोलीत दुकानदारांवर कारवाई

हुपरी : पट्टणकोडोली (हातकणंगले) येथे कोरोना प्रतिबंधक नियम तोडल्याच्या कारणावरून हुपरी पोलिसांनी किराणामाल दुकानदार, मोबाईल शॉपी, इलेक्ट्रिकल दुकानदार, बेकरीचालक यांच्यावर गुन्हे दाखल केले. पोलिसांकडून ४८ दुचाकी वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

टेंडर नोटीस

संघाच्या कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या ''वाईल्ड क्राफ्ट'' ब्रँडचे रेनसुटच्या खरेदीसाठी सिलबंद टेंडर्स मागविण्यात येत आहेत. खरेदी करावयाच्या बाबींचे वर्णन, क्वांटीटी व टेंडरच्या अटी नियम याबाबतचा तपशील संघाच्या प्रधान कार्यालयात व **www.gokulmilk.coop** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सिलबंद टेंडर्स दि. २४/०५/२०२१ पर्यंत गोकुळ शिरगांव येथील कार्यालयात देण्याची आहेत. कोणतेही टेंडर स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

कार्यकारी संचालक चेअरमन
गोकुळ
कोल्हापूर जिल्हा सह. दूध उत्पा. संघ मर्या., कोल्हापूर.
गोकुळ प्रकल्प : बी-१, एम. आय. डी. सी., गोकुळ शिरगांव, कोल्हापूर ४१६ २३४

THE UGAR SUGAR WORKS LIMITED
Regd. Office: Mahaveernagar (Wakhar Bhag), SANGLI - 416416
CIN: L15421PN1939PLC006738

NOTICE

NOTICE is hereby given that, the meeting of the Board of Directors of the Company will be held on **Friday, the 28th May, 2021, through Video Conference / AVC**, to approve and take on record Audited Financial Results and Segment wise Revenue Results for the quarter and year ended, **31st March, 2021.**

Further in accordance with SEBI (Prohibition of Insider Trading) Regulations, 2015. We have already announced Prohibitions of Trading by Insiders, the Trading Window for dealing in the securities of the Company Shall remain Closed for the Directors, Designated Employees and insiders from 1st April, 2021 to till 48 hour after the declaration of financial Result (both days inclusive).

Place : Sangli
Date : 13.05.2021

For The Ugar Sugar Works Ltd.
Tushar V. Deshpande
Company Secretary

जागा विकसित करण्यासाठी निविदा

आमच्या संस्थेची बी वॉर्ड, कोल्हापूर येथील सि.स.नं. १०७८ वरील जागा विकसित करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. त्यासाठी आवश्यक माहिती व अटी-शर्ती यासाठी खासबाग येथील संस्थेच्या कार्यालयात स. ११ ते सायं. ४ या वेळत संपर्क साधावा.
निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख-२३ मे २०२१ पर्यंत आहे.

अध्यक्ष सचिव
गायन समाज देवल क्लब

तीन दुकाने सील, २५१ जणांवर कारवाई

कोल्हापूर : कोरोनाचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या २५१ जणांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून १ लाख ३० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. विनामास्क, सोशल डिस्टन्सचे पालन न केलेल्या २५१ नागरिकांच्याकडून १ लाख ३० हजार रुपये दंड वसूल केला. सकाळी ११ नंतर दुकाने सुरु ठेवणाऱ्या ३ दुकानदारांकडून १२ हजार दंड वसूल केला. महानगरपालिका, केएमटी आणि पोलिस यांनी पाच पथके दंडात्मक कारवाईसाठी स्थापन केली आहेत.

जाहीर नोटीस

तमाम नागरिकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, १) मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोटतुकडी तहसिल करवीर, ता.करवीर, मे. दुय्यम निबंधकसो. करवीर यांचे अधिकार कक्षातील जिल्हा परिषद स्थळ सिमेतील २०५/१/अ/२/प्लॉट नं./६ क्षेत्र ८४.५० चौ.मी. व त्यावरील बांधकाम क्षेत्र ६०.४० चौ.मी. याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. १२१७, मौजे शिंगणापूर, ता.करवीर, जि. कोल्हापूर ही मिळकती निवासी मिळकत याची चतु:सीमा पूर्वेस - कॉलनी रस्ता, पश्चिमेस - रि.स.नं. ३३०/१ ची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नं.७ ची मिळकत, उत्तरेस- प्लॉट नं. ५ ची मिळकत, येणेप्रमाणे वरील चतु:सीमेतील मिळकत या जाहीर नोटिसीचा विषय होय. २) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री.संभाजी काशिनाथ कदम यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची असे सदर मिळकत आमचे अशिलांना जागा मालक यांनी कायम खुषखरेदी देण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे जागा मालक यांनी आमचे अशिलाशी व्यवहार ठरवून करारपत्राने विसारा रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निष्कर्जी व निर्वेध असलेबाबत निर्वाळा जागा मालक यांनी करून दिला आहे. ३) तरी सदर नोटिसीने कळविण्यात येते की, सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कोणाचाही, कसलाही हक्क, अधिकार अथवा हितसंबंध, बोजा, पारगी असलेस कागदपत्रासह खुलासा करावा. तसे न झालेस मुदती अंती सदर मिळकत निष्कर्जी व निर्वेध असलेचे समजून आमचे अशील कायम खुषखरेदीचा व्यवहार पूर्ण करतील तदनंतर कोणाचीही, कसलीही तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही म्हणून दिली जाहीर नोटीस. कोल्हापूर. दिनांक - १४/०५/२०२१.

अशिलातर्फे वकील
सही/- ॲड. संदीप दि. पाटील
ऑफिस - १८०२, 'ए' वॉर्ड, रुपा अपार्टमेंट, निवृत्ती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर

जाहीर नोटीस

तमाम लोकांना जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा कोल्हापूर, पोटतुकडी व तहसिल करवीर, मे. दुय्यम निबंधकसो. करवीर यांचे कार्य अधिकार कक्षेतील कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील ई वॉर्ड, शाहुपुरी येथील सि.स.नं. २०५/ब २ स्थित कोणार्क सेंटर अपार्टमेंट मधील पहिल्या मजल्यावरील कॅबिनेट/ऑफिस युनिट नं. ८ यासी प्रॉपर्टी कार्डाप्रमाणे क्षेत्र ४५.११ चौ.मी. बिल्टअप, यासी चतु:सीमा पूर्वेस - ओपन स्पेस, पश्चिमेस- ताराबाई पार्क रोड, दक्षिणेस- ऑफिस / कॅबिनेट युनिट ९, उत्तरेस- ऑफिस/ कॅबिनेट युनिट नं. ९१, येणेप्रमाणे वर्णनाची व चतु:सीमेतील कॅबिनेट युनिट मिळकत १) श्रीमती शुलीकई प्रताप जेवराणी व २) श्री.रमेश प्रताप जेवराणी, रा.कोल्हापूर यांच्या मालकीची आहे. सदर मिळकत उपरोक्त मालकांकडून आमचे अशील कायम खुषखरेदी घेणार आहेत. त्याबाबत उभयतांचे दरम्यान अंतिम वाटाघाटी झालेल्या आहेत. सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी, निर्जोखमी असलेचा सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबीत नसलेचा तसेच इतर कोणत्याही बँक, पतसंस्था यांचे सदर मिळकतीवर कर्ज नसलेचा जागा मालकांनी आमचे अशिलांना निर्वाळा दिला आहे. तरीपण सदर मिळकतीसंबंधीत व व्यवहाराबाबत कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, अधिकार अगर हरकत असलेस प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसांचे मुदतीत खाली नमूद केले पत्त्यावर योग्य त्या कागदपत्राद्वारे खात्री पटवून द्यावी. मुदतीत तसे न केलेस आमचे अशील सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही, कसलीही तक्रार ग्राह्य होणार नाही याची नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस आज ता.१५/०५/२०२१.

उपरोक्त अशिलातर्फे वकील
सही/- ॲड. किरण रा.खटावकर
(ॲडव्होकेट व नोटरी)
रामप्रभा, सि.स.नं १९९०, ए वॉर्ड, साकोली कॉर्नर, कोल्हापूर. मो.९८२२४२००७५.

पोलीस अधीक्षकांकडून बंदोबस्ताचा आढावा

- इचलकरंजीला दुपारी अचानक भेट
- पोलीस अधिकाऱ्यांची घेतली बैठक

प्रतिनिधी
इचलकरंजी

जिल्हा प्रशासनाने कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी रात्री बारा वाजल्यापासून जिल्ह्यात कडक लॉकडाऊन जाहीर केला आहे. या लॉकडाऊनच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणात पोलीस रस्त्यावर उतरणार आहेत. त्याचा आढावा आणि छत्रपती संभाजी महाराज जयंती, महात्मा बसवेश्वर जयंती, परशुराम जयंती आणि रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी शहरात तैनात केलेल्या पोलीस बंदोबस्ताची तपासणी जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी शुक्रवारी दुपारी केली.

त्यानंतर पोलीस अधीक्षक बलकवडे यांनी शहरातील अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयात इचलकरंजीतील सर्व पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीत त्यांनी शनिवारी मध्यरात्रीपासून सुरु होणाऱ्या कडक लॉकडाऊनच्या काळात पोलीस बंदोबस्त कशा पध्दतीने तैनात करावा यासह अन्य बाबींवर मार्गदर्शन केले. या बैठकीला अप्पर पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड, पोलीस उपाअधीक्षक बाबूराव महामुनी, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीकांत पिंगळे, गावभागचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गजेंद्र लोहार, शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास अडसुळ आदी उपस्थित होते.

चोरीप्रकरणी इचलकरंजीतील माजी नगरसेवक पोलिसांच्या रडारवर

इचलकरंजी : शिवाजीनगर पोलिसात गुरुवारी रात्री धाडसी चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याची गांभीर्याने दखल घेऊन पोलिसांनी तपास सुरु केला आहे. संबंधित चोरी शहरातील एका माजी नगरसेवकाच्या सांगण्यावरुन त्याच्या टोळीने केल्याची माहिती पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

चोरीची फिर्याद पोलिसात दाखल झाल्यानंतर माजी नगरसेवकाने संबंधित फिर्यादी व्यक्तीबरोबर संपर्क साधला. तू पोलिसात फिर्याद देवू नकोस. तुझे चोरी गेलेल्या साहित्याचे पैसे देतो, असे सांगून गुरुवारी रात्री राजकीय दबाव टाकण्याचा प्रयत्न देखील केल्याची माहिती पोलिसांच्या तपासात पुढे आली आहे. त्यामुळे पोलिसांनी चोरीचा हा गुन्हा उघडकीस आणत या चोरीत संबंधित माजी नगरसेवकाचा हात आहे की नाही या दिशेने तपास सुरु केला आहे.

पोलिसांच्या कारवाईत १५ दुचाकी जप्त

कसबा बावडा : संचार बंदी असताना येथील पॅव्हेलियन ग्राऊंडवर खेळायला व फिरायला आलेल्या तरुणांच्या १५ दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या. पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली.

भावपूर्ण श्रद्धांजली

आमच्या संस्थेचे व्हा.चेअरमन श्री. सिद्धार्थ नाथा कुरणे यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना..!

कै. श्री. सिद्धार्थ नाथा कुरणे

चेअरमन, सचालक, सभासद, कर्मचारी
- भिमदीप वारणा सह. पाणी पुरवठा संस्था
- बौद्ध समाज शेती कमिटी, खोची, ता. हातकणंगले

टीप : जलदान विधी शनिवार दि.१५ रोजी सकाळी १० वाजता आहे.

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., शाहूनगर, परिते

ता.करवीर, जि.कोल्हापूर (महाराष्ट्र)
शाहूनगर फोन नं. (०२३१) २३८५२२३ ते २४, कोल्हापूर- (०२३१) २६५४९२५
फॅक्स नं. (०२३१) २३८५०२६ Email ID- bhogawatissk@rediffmail.com

खुली साखर विक्री टेंडर नोटीस

केंद्र शासनाच्या धोरणानुसार आमचे कारखान्यास केंद्रशासन ऑर्डर नं. एफ नं. १०-१/(२०२१)- एस.सी. दिनांक १३/०५/२०२१ नुसार हंगाम २०१८/१९ मधील ३०००० क्विंटल व हंगाम २०१९-२० मधील २०००० क्विंटल ग्रेडच्या साखर फॉल्याची टेंडर पध्दतीने विक्री करावयाची आहे. त्यासाठी मान्यताप्राप्त व्यापाऱ्यांनी टेंडर दि. १८/०५/२०२१ पर्यंत ४९४, ई वॉर्ड, शाहूपुरी, कोल्हापूर (व्यापारी पेठ) येथील कारखान्याच्या ऑफिसमध्ये किंवा Email - bhogawatissk@rediffmail.com यावर सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत जमा करावीत. तसेच या तारखेव्यतिरिक्त कारखाना व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार दरवाजावरील साखर व्यापाऱ्यांना टेंडर भरणेसंदर्भात कळविण्यात येईल व त्यादिवशी आलेली टेंडर्स स्वीकारली जातील. अधिक माहितीसाठी वरील पत्त्यावर (फोन नं. ०२३१-२६५४९२५) वर संपर्क साधावा. टेंडर स्वीकारणेचा अगर नाकारणेचा तसेच टेंडर मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार कारखान्याने राखून ठेवला आहे.

मा. संजय श्री. पाटील
प्र.कार्यकारी संचालक

मा. उदयसिंह द. पाटील - कौलवकर
व्हा. चेअरमन

मा. श्री. पी. एन. पाटील - सडोलीकर
चेअरमन

शाहूनगर (परिते), दि. १४/०५/२०२१

ग्रुप ग्रामपंचायत काजीर्णे म्हाळुंगे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर
जाहीर खुली निविदा सूचना क्र १. २०२१-२२

ग्रुप ग्रामपंचायत काजीर्णे म्हाळुंगे, ता चंदगड, जि. कोल्हापूर स्मार्ट ग्राम योजना सन २०१९-२० अंतर्गत अ. क्र १ ते ७ सिलबंद निविदा व साहित्याचे दरपत्रक अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	मुदत	अंदाजित रक्कम	बयाना रक्कम	फॉर्म फी
१	आर.सी.सी. गटर्स म्हाळुंगे	३ महिने	९९,७५६/-	९९७	१००
२	हाय मास्ट	३ महिने	२,९८,०००/-	२९८०	१००
३	हाय मास्ट led	३ महिने	२,६२,०००/-	२६२०	१००
४	ग्रामपंचायत कार्यालयात pop	३ महिने	८१,७४२/-	८१७	१००
५	ग्रामपंचायत फर्निचर	३० दिवस	९९,८००/-	नोंदणीकृत पुरवठादार	
६	ग्रामपंचायत मिटिंग टेबल, खुर्च्या	३० दिवस	९७,२००/-		
७	ओपन जिम	३० दिवस	९८,०००/-		

नियम व अटी - १) कोरा निविदा तारीख १४/०५/२०२१ २) निविदा स्वीकारण्याची तारीख १४/०५/२०२१ ३) निविदा उघडण्याची तारीख २०/०५/२०२१ ४) निविदा उघडण्याची तारीख बदलेचा व मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रा.प राहील

सही/- ग्रामसेवक सही/- सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत काजीर्णे म्हाळुंगे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

Muthoot Finance

मुथुट होमफिन (इंडिया) लि.,
कॉर्पोरेट कार्यालय : १२०१ आणि १२०२, गाराम्य प्लाझा, 'ए' विंग, लोटस कॉर्पोरेट पार्क, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे लगत, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३.

ताबा सूचना

(दि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, २००२ च्या नियम ८(१) सह वाचावयाच्या परिशिष्ट-IV नुसार)

ज्याअर्थी, मुथुट होमफिन (इंडिया) लि., (एमएचआयएल) चे अधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार आणि दि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ३ सोबत वाचावयाच्या कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना येथील निम्नलिखित कर्जदारांना/हमीदारांना मागणी सूचना निर्गमित करून उक्त सूचना प्राप्त होण्याच्या तारखेपासून ६० दिवसांत सूचनेत नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदारांना/सहकर्जदारांना/हमीदारांना आणि सामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, उक्त नियमांच्या नियम ८ सोबत वाचावयाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १३(४) नुसार त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करून निम्नस्वाक्षरीकारांनी येथील निम्नवर्णित मालमत्तेचा सांकेतिक/भौतिक ताबा घेतला आहे. विशेषत: कर्जदाराला व सामान्यत: जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की या मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार हा येथील निम्नोल्लेखित प्रमाणे रकमेसाठी त्यावरील व्याजासह मुथुट होमफिन (इंडिया) लि., यांच्या भाराधीन राहील.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्रमांक/ शाखा	सुरक्षित मालमत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता)	मागणी सूचनेची तारीख आणि एकूण थकबाकी रक्कम (रु.)	ताबा तारीख
१	धानोजी कल्लाप्पा कुंभार / कल्लाप्पा महादेव कुंभार / शांताबाई कल्लाप्पा कुंभार / महादेव कल्लाप्पा कुंभार / ००१-०००००३१ / कोल्हापूर	गट नं. १६६२, मौजे कणेरी, ता. करवीर, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२३४ उपनिबंधक कोल्हापूर यांचे कार्यालयात सेल डीड रजिस्टर्ड नं. ६९४/२०१३, दिनांकित १८/०२/२०१३ मध्ये अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा - उत्तर - उर्वरीत मिळकत, दक्षिण - महादेव पाटील यांची मिळकत, पूर्व - दिवटे यांची मिळकत, पश्चिम - रस्ता.	२६-१२-२०२० रु. १०,४७,९१९/- (रुपये दहा लाख सत्तेचाळीस हजार नऊशे एकोणीस फक्त)	१२-०५-२०२१
२	नितेश शिवाजी मलवडे / शिवाजी नितेश मलवडे / मनिषा शिवाजी मलवडे / मनिषा नितेश मलवडे / ००१-००००१५२ / कोल्हापूर	घर नं. २२२३, गट नं. ५८७, भोसले वाडी, गणेश कॉलनी, पु/पो. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, कोल्हापूर, महाराष्ट्र-४१६१२२. उपनिबंधक हातकणंगले यांचे कार्यालयात सेल डीड रजिस्टर्ड नं. ३६०७/२००६, दिनांकित - १९/०६/२००६ मध्ये अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा - उत्तर - खुली जागा, दक्षिण - अंतर्गत रस्ता, पूर्व - खुली जागा, पश्चिम - खुली जागा.	२६-१२-२०२० रु. २३,४८,४३८/- (रुपये तेवीस लाख अठ्ठेचाळीस हजार चारशे अडतीस फक्त)	१२-०५-२०२१
३.	अशोक गुणवंत भोसले / कुमार गुणवंत भोसले / आरती अशोक भोसले / ००१-००००१५१ / कोल्हापूर	गट नं. २८/१२ खापरे मळा, समर्थ रोड, गोकुळ शिरगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पुणे, महाराष्ट्र - ४१६१२२. उपनिबंधक करवीर ४ यांचे कार्यालयात सेल डीड रजिस्टर्ड नं. १०२१/२०१७, दिनांकित - १०/०४/२०१७ मध्ये अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा - उत्तर - घर, दक्षिण - घर, पूर्व - घर, पश्चिम - अंतर्गत रस्ता.	२६-१२-२०२० रु. ४,८५,५६१/- (रुपये चार लाख पंच्याऐंशी हजार पाचशे एकसष्ट फक्त)	१२-०५-२०२१
४.	जयश्री दत्तात्रय पोवार / दत्तात्रेय बाळकू पोवार / ००१-००१००४०२ / कोल्हापूर	मिळकत नं. ४६३, गट नं. २४१, महादेव नगर, कणेरी, ता. करवीर, कोल्हापूर, कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६२३४. उपनिबंधक करवीर ३ यांचे कार्यालयात सेल डीड रजिस्टर्ड नं. ६१८/२०१७, दिनांकित - ०४/०२/२०१७ मध्ये अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा - उत्तर - मोरे यांची मिळकत, दक्षिण - रस्ता, पूर्व - पावले यांची मिळकत, पश्चिम - कुंभार यांची मिळकत.	२६-१२-२०२० रु. ११,११,१७६/- (रुपये अकरा लाख अकरा हजार एकशे शाहत्तर फक्त)	१२-०५-२०२१
५	किरण बाबू कांबळे / जयश्री किरण कांबळे / ००१-००१०१३५१ / कोल्हापूर	युनिट नं. / फ्लॅट नं. ३बी, पहिला मजला आर. एस. नं ४०/१, प्लॉट नं. ३, आरुष रेसिडन्सी, मु.- सम्राटनगरवाडी, ता. करवीर, कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६००४. उपनिबंधक कोल्हापूर २ यांचे कार्यालयात सेल डीड रजिस्टर्ड नं. ५८२७/२०१८, दिनांकित - २७/०९/२०१८ मध्ये अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा - उत्तर - रस्ता, दक्षिण - शिवाजी भोसले यांची मिळकत, पूर्व - मगुते यांची मिळकत, पश्चिम - खुला भूखंड	२६-१२-२०२० रु. ७,७६,८०५/- (रुपये सात लाख शाहत्तर हजार आठशे पाच फक्त)	१२-०५-२०२१
६.	सातप्पा लक्ष्मण जाधव / शितांजली सातप्पा जाधव / ००१-०००००३५१ / कोल्हापूर	मिळकत नं. १५००, जाधव गल्ली, कणेरी, ता. करवीर, कोल्हापूर, कोल्हापूर, महाराष्ट्र- ४१६२३४. उपनिबंधक करवीर ३ यांचे कार्यालयात सेल डीड रजिस्टर्ड नं. ०१२२१/२००८, दिनांकित - १४/०३/२००८ यांचे कार्यालयात अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा, उत्तर - भार यांची मिळकत, दक्षिण - रस्ता, पूर्व - विठ्ठलभाले मिळकत, पश्चिम - डावरे यांची मिळकत.	२७-०१-२०२१ रु. ११,७३,५६२/- (रुपये अकरा लाख त्र्याहत्तर हजार पाचशे बासष्ट फक्त)	१२-०५-२०२१
७.	मोहित विजय बंगुडे / विजय मल्लाप्पा बंगुडे / संगिता विजय बंगुडे / ००१-००१००७१८ / कोल्हापूर	सी. एस. नं. १९१/ए, माळे गल्ली, मु. नागाव, ता. हातकणंगले, कोल्हापूर, कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६१२२. उपनिबंधक हातकणंगले यांचे कार्यालयात सेल डीड रजिस्टर्ड नं. ०००८२-२०१०, दिनांकित - ०५/०१/२०१० मध्ये अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा - उत्तर - लोहार यांची मिळकत, दक्षिण - रस्ता, पूर्व - ताडकर यांची मिळकत, पश्चिम - शिंदकर यांची मिळकत.	२७-०१-२०२१ रु. ६,०९,८२३/- (रुपये सहा लाख नऊ हजार आठशे तेवीस फक्त)	१२-०५-२०२१
८.	संजय सिताराम देसाई / अनिता संजय देसाई / ००१-००१००३११ / कोल्हापूर	प्लॉट नं. १६, गट नं. ३९७/ए, विवेकानंद नगर, पु. कोरोची, ता. हातकणंगले, कोल्हापूर, कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६१२१. सेल डीड रजिस्टर्ड नं. ५१४२-२०१६, दिनांकित - ११/१२/२०१६ अन्वये उपनिबंधक इचलकरंजी नं. १ यांचे अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा - उत्तर - रस्ता, दक्षिण - प्लॉट नं. १५, पूर्व - रस्ता, पश्चिम - प्लॉट नं. १७.	२७-०१-२०२१ रु. १३,८८,९५७/- (रुपये तेरा लाख अठ्ठ्याऐंशी हजार नऊशे सत्तावन्न फक्त)	१२-०५-२०२१
९.	अनंत शिवाजी जाधव / मंगल शिवाजी जाधव / शिवाजी बसंत जाधव / ००१-००१०१८२४ / कोल्हापूर	घर, मिळकत नं. १४२९, आर. एस. नं. १६०७, दत्त कॉलनी, पु. कणेरी, ता. करवीर, पाण्याच्या टाकीजवळ, कणेरी, कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६२३४. उपनिबंधक करवीर नं. २, कोल्हापूर यांचे कार्यालयात सेल डीड रजिस्टर्ड नं. ५०९२-२०१९, दिनांकित - ११/१०/२०१९ मध्ये अधिक विशेषत्वाने नमूद. यांसी चतु:सीमा - उत्तर - रस्ता, दक्षिण - खुली जमीन, पूर्व - संभाजी तुकाराम पाटील, पश्चिम - गोपाळ कृष्णा बांदेकर (घर)	२७-०१-२०२१ रु. ११,२२,७३३/- (रुपये अकरा लाख बावीस हजार सातशे तेहतीस फक्त)	१२-०५-२०२१

स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : १५.०५.२०२१

सही/- अधिकृत अधिकारी
मुथुट होमफिन (इंडिया) लि., करिता